मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

RNI Regd. No. 72105/99 ❖ वर्ष २६ ❖ अंक ३३९ ❖ रविवार दि.८ सप्टेंबर २०२४ पाने ४ ❖ किंमत ५/-

## महत्त्वाचे

### भारतात बनवणार अनेक सिंगापूर : पंतप्रधानांनी व्यक्त केली इच्छा

**सिंगापूर :** सिंगापूर हा प्रत्येक विकसनशील देशासाठी प्रेरणा आणि आदर्श आहे. भारतात अनेक सिंगापूर बनविण्याची आपली इच्छा आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केले.

पंतप्रधान मोदी दोन दिवसाच्या सिंगापूर दौऱ्यावर आहेत. सिंगापूरच्या संसदेत त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांच्याबरोबर त्यांची बैठक झाली. या बैठकीत डिजिटल तंत्रज्ञान, माहिती सुरक्षा, उत्पादन क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा अनेक क्षेत्रात दोन्ही देशांनी सहकार्य करण्याबाबत चर्चा झाली.

या बैठकीनंतर बोलताना मोदी म्हणाले की, सिंगापूर हा केवळ भारताचा जवळचा भागीदार नाही, तर सर्वच विकसनशील देशांसाठी सिंगापूर हा आदर्श आहे. भारत आणि शिंगणापूर या दोन्ही देशातील मंत्रिस्तरीय गोलमेज परिषद ही द्विपक्षीय सहकार्याची पथदर्शी यंत्रणा ठरली आहे.

# नवदीपने भालाफेक स्पर्धेत जिंकलं पहिलं सुवर्णपदक, सिमरनला कास्य

**मुंबई :** नीरज पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताची जबरदस्त घोडदौड सुरूच आहे. ७ सप्टेंबर (शनिवारी) रोजी पुरूषांच्या भालाफेक स्पर्धेत (F41) भारताच्या नवदीप सिंहने सुवर्ण पदक जिंकले. ऑलिम्पिकमध्ये नीरज चोप्राचे सुवर्ण पदक हुकले. त्याला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले होते. मात्र नवदीपने पॅराऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत प्रथमच सुवर्ण पदक जिंकण्याचा विक्रम करून दाखविला आहे. खरंतर नवदीपला आधी रौप्य पदकाची घोषणा झाली होती. मात्र इराणचा खेळाडू अपात्र ठरल्यामुळे नवदीपच्या रौप्य पदकाला सुवर्णमध्ये बढती मिळाली. तसेच महिलांच्या २०० मीटर (T12) धावण्याच्या स्पर्धेत भारताची धावपटू सिमरन शर्माने कास्य पदकाची कमाई केली आहे.

या दोन पदकाच्या विजयानंतर आता भारताची पॅरिस पॅराऑलिम्पिकमधील पदकाची संख्या २९ वर पोहोचली आहे. भारताने आतापर्यंत ७ सुवर्ण, ८ रौप्य आणि १४ कास्य पदक जिंकले आहे. पदक तालिकेत भारत सध्या १५ व्या स्थानावर आहे.

नवदीप सिंहे अंतिम फेरीत दुसऱ्या प्रयत्नात ४७.३२ मीटर अंतरावर भाला फेकला. नवदीपच्या कारकिर्दीतील हा सर्वात उत्कृष्ट थ्रो होता. इराणच्या सादेघ सयाह बेत याने पाचव्या प्रयत्नात ४७.६४ मीटर अंतरावर भाला फेकला होता. त्याला सुवर्णपदक दिल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र नंतर तो अपात्र असल्याचे आढळून आल्यामुळे नवदीप सिंहला रौप्यच्या जागी सुवर्ण पदक बहाल करण्यात आले.

दुसरीकडे महिलांच्या २०० मीटर धावण्याच्या अंतिम फेरीत सिमरन शर्माने २४.७५ सेकंदात धाव पूर्ण केली. अंतिम फेरीत क्युबाच्या ओमारा इलियासे सुवर्ण (२३.६२ सेकंद), व्हेनेझुएलाच्या पाओला अलेक्झांड्राला रौप्य (२४.१९ सेकंद) तर भारताच्या सिमरनला कास्य पदक मिळाले.




# महायुतीच्या नेत्यांना सद्बुद्धी द्या: भुजबळ यांचे गणरायाला अजब साकडे

**मुंबई :** सध्याच्या काळात महायुतीच्या नेत्यांकडून केल्या जाणाऱ्या बेताल वक्तव्याच्या अनुषंगाने ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनी, महायुतीच्या नेत्यांना सद्बुद्धी द्या, असे अजब साकडे गणरायाच्या चरणी घातले आहे.

अंजीरवाडी येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात भुजबळ यांनी गणरायाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी विविध विषयांवर पत्रकारांशी संवाद साधला.

महायुतीतील घटक पक्षांना एकत्रपणे विधानसभा निवडणुकीला सामोरे जायचे आहे. त्यामुळे कोणतेही वक्तव्य करताना महायुतीच्या नेत्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्या वक्तव्याने कोणताही वाद निर्माण होईल अथवा आपल्यात भेदभाव आहे असे चित्र जनतेसमोर उभे राहील अशी विधाने महायुतीच्या नेत्यांनी करू नयेत, असे आवाहन भुजबळ यांनी केले.

भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट किंवा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यासह महायुती सहभागी असलेल्या सर्व घटक पक्षांना समान न्याय दिला जाईल. कोणावरही अन्याय केला जाणार नाही, अशी ग्वाही भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून मिळाली असल्याचा दावाही भुजबळ यांनी केला.

सध्याच्या काळात राजकीय समीकरणे बदलली आहेत. राज्यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि भाजप असे सहा पक्ष कार्यरत आहेत. बदललेल्या समीकरणांमुळे काहीजण असे आहेत की ज्यांना विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळण्याची खात्री होती पण प्रत्यक्षात ती मिळू शकत नाही. त्यामुळे उमेदवारी मिळवण्यासाठी काही जणांची एका पक्षातून दुसऱ्या पक्षात आवक जावक होत आहे. ते स्वाभाविकच आहे, असेही भुजबळ म्हणाले.

मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून आरक्षण द्यावे का, हा माझा महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्हीतील नेत्यांना सवाल आहे. याला कोणीही तयार होणार नाही याची आपल्याला खात्री आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. मात्र त्यांना ओबीसीमधून आरक्षण न देता स्वतंत्र आरक्षण दिले पाहिजे. इतर कोणत्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशीच सर्वांची भूमिका आहे. महायुती सरकारने मराठा समाजाला यापूर्वीच दहा टक्के आरक्षण दिलेले आहे, असेही भुजबळ यांनी नमूद केले.

# राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येऊ दे

## भाजपाच्या उंबरठ्यावर ताटकळलेल्या खडसे यांची गणेशाकडे प्रार्थना

जळगाव : राज्यातील राजकारण चांगले राहिलेले नाही. जनता महागाईने त्रस्त आहे. फोडाफोडीच्या राजकारणाला कंटाळली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर यावे, अशी प्रार्थना भारतीय जनता पक्षाच्या उंबरठ्यावर उभे असलेले ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी गणेशाकडे केली आहे.



मूळचे भाजपचे मात्र नंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वळचणीला गेलेले खडसे यांना पुन्हा भाजपमध्ये परतण्याची इच्छा आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या उपस्थितीत आपण पक्षात आलेलोच आहोत. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या विरोधामुळे आपला पक्षात अधिकृतपणे प्रवेश करून घेतला जात नाही, असा आरोप खडसे यांनी नुकताच केला होता. त्याबरोबरच, फडणवीस आणि महाजन हे नड्डा यांच्यापेक्षा मोठे झाल्याची उपरोधिक टीकाही त्यांनी केली होती.

भाजपा प्रवेशाचे घोंगडे भिजत पडल्यामुळे ताटकळलेल्या खडसे यांनी राज्यातील भाजप नेत्यांना अखेरचा इशाराही दिला आहे. भाजपामध्ये प्रवेश मिळण्यासाठी आपण फार काळ वाट बघू शकत नाही. लवकरात लवकर आपल्याला पक्षात प्रवेश न दिल्यास आपण पुन्हा अधिक जोमाने राष्ट्रवादी काँग्रेसचे काम सुरू करू, असे ते म्हणाले.

# गणेशोत्सवात केली जाणार कचरा व्यवस्थापन जनजागृती

**पनवेल:** यावर्षी विघ्नहर्ता गणेश प्राणप्रतिष्ठा आणि आंतरराष्ट्रीय स्वच्छ वायू दिन एकाच दिवशी दि. ७ रोजी येत आहेत. याचे औचित्य साधून गणेशोत्सवादरम्यान घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी ग्रामीण प्रगती फाउंडेशन, मास्टेक फाउंडेशन, नवी मुंबई महापालिका आणि पनवेल महापालिका यांनी पुढाकार घेतला आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेने ७ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्वच्छ वायू दिन म्हणून घोषित केला आहे. 'स्वच्छ हवा, निळे आकाश' ही या दिवसाची संकल्पना आहे. सध्याच्या काळात शुद्ध हवा ही अत्यंत दुर्मिळ होत असताना प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाचीच जबाबदारी बनलेली आहे. या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापनात जनसहभाग वाढविण्यासाठी स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक भान असलेली कॉर्पोरेट कंपनी यांनी परस्पर सहकार्याने ही जनजागृती मोहीम हाती घेतली आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ धार्मिक अथवा सांस्कृतिक उत्सव नाही. तर ते समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन आहे. या उत्सवाची स्थापनाच जनजागृतीच्या उद्देशाने करण्यात आली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात विविध गणेशोत्सवांना भेट देऊन त्यांच्या सहकार्याने व्याख्याने, प्रदर्शन, दृक् श्राव्य सादरीकरण, प्रात्यक्षिक अशा उपक्रमातून कचरा व्यवस्थापन आणि लोकसहभाग या बाबत जनजागृती केली जाणार आहे.

# अखेर पूजा खेडकर प्रशासकीय सेवेतून बडतर्फ

**नवी दिल्ली:** विविध गुन्हे दाखल असलेली वादग्रस्त प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकारी (आयएएस) पूजा खेडकर हिला केंद्र सरकारने प्रशासकीय सेवेतून बडतर्फ केली आहे. तिच्यावर फसवणुकीसह अनेक गुन्हे दाखल आहेत.

पूजा खेडकर हिने बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून दिव्यांग प्रवर्गातून भारतीय प्रशासकीय सेवेची परीक्षा दिली. मर्यादेपेक्षा अधिक वेळा नावे बदलून परीक्षेला बसली. स्वतःबरोबरच आई-वडिलांची नावेही बदलली. आई-वडिलांचा घटस्फोट झाल्याचे खोटे सांगितले. कुटुंबाचे उत्पन्न मर्यादेपेक्षा अधिक असूनही नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र सादर केले असे अनेक आरोप तिच्यावर आहेत.

प्रशासकीय सेवा परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पूजा ची पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. या ठिकाणी नियुक्तीवर असताना तिने आणि तिच्या प्रशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या वडिलांनी जबरदस्तीने वरिष्ठांचा कक्ष बळकावला. या प्रकारानंतर जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी तिच्याबद्दल तक्रार केली. त्यानंतर पूजा खेडकर हिचे अनेक गैरप्रकार उघडकीला आले.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने पूजा खेडकर हिची प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून नियुक्ती रद्द केली. यापुढे आयोगाची परीक्षा देण्यास तिला कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली. त्याचप्रमाणे तिच्यावर पोलिसांकडे गुन्हा देखील दाखल करण्यात आला. आता केंद्र शासनाकडून तिच्या बडतर्फीचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यामुळे तिला कधीही अटक होऊ शकते.



# नितेश राणे यांनी मागावी मुस्लिम समाजाची माफी : परशुराम वाडेकर यांची मागणी



**पुणे :** आमदार नितेश राणे हे सातत्याने सामाजिक समतोल बिघडेल अशी बेताल वक्तव्य करत आहेत. मुस्लिमांना मशिदीत जाऊन चुन चुन के मारेंगे, पोलीस माझे काहीही वाकडे करू शकत नाहीत, या सारख्या वक्तव्यांमुळे मुस्लिम समाजात भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. एका संवैधानिक पद्धतीने निवडून आलेल्या आमदाराच्या तोंडी अशी हिंसक भाषा शोभत नाही. आम्ही त्यांच्या व्यक्तव्याचा तीव्र निषेध करतो. तसेच राणे यांनी भविष्यात अशी प्रक्षोभक वक्तव्य करू नये आणि मुस्लिम समाजाची माफी मागावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे राज्य संघटक परशुराम वाडेकर यांनी केली आहे.

शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. अलीकडे राज्यातील काही नेते जाणीवपूर्वक हिंदू - मुस्लिम समाजात दुही निर्माण होईल अशी वक्तव्य करत आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही वक्तव्ये करण्यात येत आहेत. याचा फटका महायुतीमधील आमच्यासारख्या सहयोगी पक्षांना बसू शकतो. लोकसभा निवडणुकीच्या वेळीही काही नेत्यांच्या बेताल वक्तव्यामुळे संविधान बदलाच्या चर्चा सुरू झाल्या. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील महायुतीच्या मतांवर झाल्याचे दिसते. रिपब्लिकन पक्ष भारतीय संविधानाला मानणारा आणि धर्मनिरपेक्षतेला प्राधान्य देणारा आहे. सामाजिक सलोखा राखण्यास नेहमीच आमचे प्राधान्य राहिले आहे. एखाद्या नेत्यांच्या प्रक्षोभक भाषणाने समाजातील एखाद्या घटकाला असुरक्षित वाटेल असेल तर त्या समाजाच्या रक्षणासाठी आम्ही सदैव पुढे राहू. राणे यांनी मशीद मध्ये घुसण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मुस्लिम समाजाच्या संरक्षणासाठी पुढे येऊ, असे वाडेकर यांनी म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंदू - मुस्लिम धर्मीयांमध्ये तेढ निर्माण होईल असे कोणतेही प्रक्षोभक वक्तव्य आमदार नितेश राणे यांनी करू नये यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना सक्त ताकीद द्यावी. तसेच अन्य नेत्यांनासुद्धा बेताल, हिंसक, प्रक्षोभक वक्तव्य करू नयेत अशी समज द्यावी, अशी मागणी परशुराम वाडेकर यांनी केली आहे.

# श्रीगणेशोत्सवामुळे भोर शहरातील बाजारपेठ सजली



**भोर :** गणेशोत्सवाला केवळ दोन दिवस शिल्लक असल्याने भोर शहरातील बाजारपेठा सजावटीच्या वस्तूंनी सजल्या असून भोर शहरात खरेदीसाठी खेडो पाड्यातील उपनगरातील नागरिकांनी गर्दी केली होती. अलीकडे थर्माकॉलवर बंदी आल्यानंतर गणपती बाप्पासाठी सुशोभित आरास तयार करण्यासाठी प्लॅस्टिक फुले, फोम तसेच पुठ्ठा, कागद यांचा वापर केला जात आहे. मंदिरे, दरबार, निसर्गचित्रांचे पडदे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रीसाठी आल्या असून गणेशोत्सवात लागणाऱ्या विविध साहित्यांनी दुकाने सजली आहेत.

गणेशोत्सवाला ७ सप्टेंबरला सुरुवात होणार आहे. त्यामुळे भाविकांनी बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी केली आहे. बाजारपेठेत आकर्षक प्लास्टिक फुले, माळा, फोम, पुठ्ठा, रंगीत कागद, पडदे, मोत्यांचे

हार, पर्यावरणपूरक कागदी मखर, छोट्या दिव्यांच्या माळा, काचेची व प्लॅस्टिकची फुले, हिटलॉन शीट, क्रिस्टल माळा, यांसह फुलांचे विविध नवनवीन प्रकार, इलेक्ट्रिक साहित्यांची दुकाने भरगच्च भरली आहेत. गणेशोत्सवात आरासासाठी लागणाऱ्या वस्तू ग्राहकां कडून खरेदी केल्या जात आहेत.

मंगळवार पेठ, सुभाष चौक, नवीआळी, सम्राट चौक, परिसरात नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली होती, कमळ, केवड, दूर्वा, फुले तसेच, मखमली आसन आणि अन्य पूजा साहित्य विक्रेत्यांकडे खरेदीदारांची गर्दी होती.तर नैवेद्य पदार्थ खरेदीसाठी देखील मिठाईच्या दुकानांत गर्दी होती. सराफ बाजारातही आकर्षक सोन्या-चांदीचे दागिने खरेदी करण्यात नागरिकांची विशेष रुची दिसली.

भोर शहरातील चौपाटी,नवी आळी,मंगळवार पेठ, सुभाष चौक,



सम्राट चौक आदी ठिकाणी मोठ्या संख्येने बाप्पाच्या मूर्ती विक्रीचे स्टॉलवर गर्दी होती. शहरातील दुकानात विविध वस्तु, इलेक्ट्रिक सामान विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. विविध प्रकारच्या रांगोळ्या बाजारपेठेत विक्रीसाठी आल्या आहेत.

गणरायाची आकर्षक मूर्ती...

बाजारपेठेत गणरायाची विविध रूपे आकर्षक मूर्तीच्या स्वरूपात भक्तांसाठी उपलब्ध आहेत. पर्यावरणपूरक शाडूमातीच्या गणरायाच्या मूर्तींनाही बाजारपेठेत मागणी असल्याचे दिसून येते. यामध्ये सध्या चित्रपट, मालिकांतील पात्रांच्या स्वरूपातील मूर्तीचा ट्रेंड सर्वाधिक दिसून येत आहे.

वाहतूक कोंडीत भर...

भोर शहरातील नगरपरिषद ते एसटी स्टँडपर्यंतच्या रस्त्यावर म्हणजे नगर परिषद चौक, रावळ चौक, सुभाष चौक, काळा गणपती चौक दरम्यान मुख्य बाजारपेठ असल्यामुळें ग्रामीण भागातून खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची संख्या वाढत असल्याने मुख्य रस्त्यावर वाहतूक विस्कळीत झाली होती.खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी कोंडीतून वाट काढत खरेदी केली.

# विघ्न दूर कर रे बाबा!

गणनायका, तुझा उत्सव आजपासून सुरू होतो आहे. तू गणांचा म्हणजे जनांचा नायक आहे. तुला भक्तांसोबत राहायला आवडतं. तू भक्तांचा लाडका आहे. तुझ्या उत्सवाला अमाप गर्दी लोटते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक रुप दिलं. त्यांनी या उत्सवाचा वापर प्रबोधन आणि ब्रिटिशांविरोधात लोकांना एकत्र करण्यासाठी केला; परंतु आता तो उद्देश राहिला नसला, तरी गणेशोत्सवाचा वापर सामाजिक कामासाठी किती आणि राजकारणासाठी किती होतो, हे संशोधन करण्याची वेळ आली आहे. काही मंडळं गणेशोत्सवाच्या देखाव्यातून सामाजिक प्रबोधन करीत असतीलही; परंतु त्यांचं प्रमाण किती हा वेगळ्या संशोधनाचा भाग आहे. लोकांना एकत्र करून त्यांच्या सामाजिक आणि राजकीय जाणिवा अधिक प्रगल्भ करण्याची गरज असताना बुद्धीची देवता असलेल्या तुला हे अशक्य आहे का रे बाप्पा? कोरोना गेला असला, तरी त्यानंतर त्याचे अनेक उपप्रकार पुन्हा पुन्हा येत आहेत. आता तर मंकीपॉक्सनं जगालाच विळखा घातला आहे. भारतातही त्याचा शिरकाव झाला आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं त्याला धोकादायक श्रेणीत घातलं आहे. यावर गणेश मंडळांनी आणि आरोग्य संघटनांनी काही तरी करावं, अशी बुद्धी तू त्यांना का देत नाहीस, रे बाबा! पूर्वीच्या काळी लोकांना बाहेर पडण्यासाठी निमित्त हवं होतं. आपले विचार लोकांपर्यंत पोचविण्याची साधनं मर्यादित होती. आता तसं राहिलेलं नाही. गणेशोत्सवातील सजावटी, देखावे आणि विद्युत रोषणाई पाहण्यासाठी लोकांची गर्दी होत असते. त्यासाठी दहा दिवस रस्ते गर्दीनं फुलून जातात. गणेशोत्सवाच्या काळात किमान एक लाख कोटी रुपयांची उलाढाल होत असते. गेले काही महिने बाजारात सुस्ती होती. जागतिक आणि देशांतर्गत घटना लोकांना खिशात हात घालू देत नव्हत्या. चलन फिरलं, तरच बाजारात चैतन्य येतं. तुझ्यामुळं ते आलं. सार्वजनिक गणेशोत्सवातून अनेक कार्यकर्ते नेते घडतात, हे सत्य असलं, तरी गणेशोत्सवात मंडळांच्या कार्यकर्त्यांविरोधात वर्गणी, खंडणीच्या तक्रारी होत असतात. रस्त्यात मंडप टाकल्यानं नागरिकांच्या शिव्या-शापांचं धनी व्हावं लागत असतं; परंतु त्याच मंडळांच्या कार्यकर्त्यांनी संकट काळात घेतलेली भूमिकाही लक्षात घ्यायला हवी.

हे लंबोदरा,

लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यपूर्व काळात, जनजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केले.१८९३ मध्ये त्यांनी जुन्या काळापासून सुरू असलेल्या प्रस्थापित गणेशोत्सवांचं नव्या स्वरूपात पुनरूज्जीवन केलं. हिंदूच्या घराघरांत गणेशोत्सव अनेक शतकांपासून साजरा केला जात असे; पण टिळकांनी त्याला एका दहा दिवस चालणाऱ्या सामाजिक महोत्सवाचं स्वरूप दिलं. या उत्सवाच्या निमित्तानं भारतातील जनता एकवटेल. त्यातील सांस्कृतिक आणि बौद्धिक कार्यक्रमांच्या रुपानं तिच्यात जनजागृती निर्माण करता येईल. आपली संस्कृती आणि धर्म याबाबत तिच्या मनात नवी अस्मिता जागृत होईल, अशी ही भावना लोकमान्य टिळकांच्या मनात होती. सर्व भारतीय लोकांनी आप-आपसातील मतभेद सोडून एकत्र यावं, ही लोकमान्य टिळकांची इच्छा होती. लोकमान्य टिळकांची ही इच्छा फलद्रुप झाली. महाराष्ट्राचं सांस्कृतिक संचित म्हणून गणेशोत्सवाकडं पाहिलं जातं. आता गणेशोत्सव महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. जगभरात गणेशोत्सव पोचला आहे. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी पहिला सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्याचं सांगितलं जातं. आता त्याच मंडळाचे पुनीत बालन यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम सुरू केले आहेत.

बा गणेशा, तुला संपत्तीचा मोह कधीच नव्हता. तुझे भक्त आता तुला लाखोंचा मुकुट घालतात. सोन्यानं मढवतात. त्याऐवजी रंजल्या-गांजलेल्यांची सेवा करण्याची, त्यांच्यासाठी कायमस्वरुपीचे काही उपक्रम सुरू करण्याची बुद्धी तू त्यांना का देत नाही.

हे गणनायका, राज्यावर आणि देशावर सध्या वेगळंच संकट आहे. देशाच्या काही भागात दुष्काळ, तर काही भागात प्रचंड अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जात आहे. अगोदरच काळोखाच्या वाटेवर जाणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढली आहे. आता युवकही त्याच वाटेने चालले आहेत. तू हे सर्व पाहतोस. तुला हे दिसते. राज्यकर्ते भलेही रोजगारनिर्मितीच्या आणि शेतकऱ्यांसाठी आम्ही तिजोरी खाली केल्याचे सांगत असले, तरी वस्तुस्थिती काय आहे, हे तू जाणतोस.

प्रगत समजला जाणारा महाराष्ट्र युवकांच्या आत्महत्यांच्या बाबतीत अग्रेसर राहावा, ही शरमेची बाब आहे. स्टार्टअपमधील नोकऱ्या कमी होत आहेत. आयटी उद्योगानं भरती थांबवली आहे. हरियाणात सफाई कामगारांच्या जागांसाठी पदवीधर, द्विपदवीधरांचे ४५ हजार अर्ज आले. सुशिक्षितांच्या हाताला काम नाही. 'एम्प्टी माईंड इज डेव्हिल्स वर्कशॉप' अशी इंग्रजीत एक म्हण आहे. आता तूच याबाबत काहीतरी कर. देशातील आणि जगातील मंदी हटू दे. राज्यकर्त्यांना आणि शिक्षणधुरिणांना रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची रचना करण्याची बुद्धी दे आणि तरुणांनाही नोकऱ्यांच्या मागं न लागता काहीतरी छोटा मोठा व्यवसाय, काम करण्याचं सुचव रे बाबा!

हे वक्रतुंडा, गेल्या आठवड्यात राष्ट्रीय सांख्यिकी आयोगानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या १५ महिन्यांतील सर्वांत कमी जीडीपी नोंदवला गेला आहे. दुसरीकडं देशातील नागरिकांचं बचतीचं प्रमाण कमी झालं. कर्जबाजारी व्यक्तींची संख्या वाढली आहे. पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची भाषा करणाऱ्यांना उत्पादन आणि कृषी क्षेत्रातील वाढ अधिक झाल्याशिवाय हे उद्दिष्ट साध्य होणार नाही, हे लक्षात येत नाही का रे? भारताच्या आर्थिक विकासापुढचं आव्हान लक्षात घेऊन काही धोरणात्मक निर्णय घ्यावेत, तर तसंही नाही. निवडणुका जिंकण्यासाठी रेवड्या वाटत फिरणाऱ्या सर्वपक्षीय राजकारण्यांच्या डोक्यात काही तरी भरव रे बाबा! देशाला आणि राज्यांना मागं घेऊन जाणाऱ्यांना एकदा तरी धडा शिकव ना! सामान्य जनतेच्या डोक्यातही काही तरी प्रकाश पाड. अर्थात शेतकरी महिलेला, मुंबईतील चाळकरी महिलेला लाडकी बहीण योजनेपेक्षा शेतीमालाला भाव, गुंडांपासून सरंक्षण महत्त्वाचं वाटतं. हा प्रकाश सर्वांच्याच डोक्यात पडू दे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची लक्तरं जगाच्या वेशीवर टांगली आहे. तू हे सारं पाहतो आहेस ना बाबा! लोकांनी जगायचं कसं, हाच खरा मोठा प्रश्न आहे. नोकरी गेली, व्यवसाय बंद, असं सहन करण्याची क्षमताच लोकांमध्ये राहिली नाही. अशा हताश कुटुंबांनी काळोखाची वाट धरली. अजूनही किती लोक या वाटेवरून जायला तयार आहेत, याची गणतीच नाही. महाराष्ट्र सरकार १२ कोटी जनतेचा विमा उतरवल्याचा बडेजाव मिरवते. तसं असेल, तर कोणत्याही दवाखान्यात दाखल होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला एक पैसाही भरण्याची वेळ येऊ नये; परंतु तसं होत नाही. उपचारासाठी पैसे नसल्यानं काहींना देवाघरची वाट धरावी लागते. अर्थात तुला हे माहीत नाही, असं नाही. सर्व मंडळांनी तुझ्या उत्सवावर होणाऱ्या खर्चातील काही रक्कम बाजूला काढून एक धर्मादाय रुग्णालय सुरू केलं आणि त्यात सर्व प्रकारचे उपचार माफक दरात केले, तर जनता दुवा देईल. तू हे तुझ्या कार्यकर्त्यांना का सुचवत नाहीस?

हे महोदरा,

देशात कळ्या कुस्करण्याचं प्रमाण वाढलं आहे. एकीकडं संस्कृतीचा जप आणि दुसरीकडं विकृती. दोन-तीन वर्षांच्या चिमुरड्या, ऐंशी वर्षांच्या आजी, जीवदान देणाऱ्या डॉक्टरही अशा वासनांधांच्या शिकार होतात. त्यांना असा काही धडा शिकव, की पुन्हा त्या वाटेवर जाण्याचं धाडस नंतर कुणाला होणार नाही.कायदे कडक करून काही साध्य होणार नाही. त्यासाठी घरातून आणि समाजातून मुला-मुलींना समानतेची शिकवणूक आणि पाशवी वृत्ती निर्माण होणार नाही, असे संस्कार होण्याची गरज आहे, हे समाज आणि राज्यकर्त्यांना कधी कळणार, हे तूच जाणो. सध्याच्या या संकटाच्या काळात लोकांना धीर दे. जगण्याचं बळ दे. संकटातून सावरण्याचं धैर्य त्यांना दे. राज्य आणि केंद्रातील सरकारमधील धुरिणांना जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याची सद्बुद्धी दे. त्यांच्या पायात धावण्याचं बळ दे. चुकणाऱ्यांचा कान पकड. अशा संकटकाळातही स्वतः पुरतं पाहणाऱ्यांना चांगलीच अद्दल घडव. देशातील एक टक्का कोट्यधीशांना आपल्या काही संपत्तीतील वाटा गोरगरीबांच्या कल्याणासाठी खर्च करण्याची बुद्धी दे. संकटात कामगारांचं शोषण करणाऱ्या कंपन्यांच्या मालकांना तू चांगलीच अद्दल घडव. लोकांच्या अपेक्षा फार आहेत. त्या कुणीही पूर्ण करणार नाही. करू शकणार नाही, हे खरं असलं, तरी किमान हाता-तोंडाची गाठ पडावी आणि हाताला कामं मिळावं, एवढी तरी माफक अपेक्षा पूर्ण करावी, अशी हे अपेक्षा केली, तर हे जगन्नियत्या तुला ते नक्कीच अशक्य नाही. तुझं उदर मोठं आणि लांब आहे. तुझ्या या भक्तांचं काही चुकत असेल, तर त्यांचे गुन्हे पोटात घे. त्याला माफ कर आणि संकटावर मात करण्याची शक्ती त्याला दे. अर्थव्यवस्थेची चाकं गतिमान कर. तसं झालं, तर सर्वंच समस्यांतून मार्ग काढला जाईल. तू विघ्नहर्ता आहेस. त्यामुळं तू सध्याची विघ्नं दूर कर रे बाबा!



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)पक्ष पाटण तालुका( मुंबई) यांच्यावतीने

## पक्षाच्या मुंबई कमेटीच्या प्रमुख सल्लागार पदी भागवतराव वरेकर

पाटण :- भागवतराव वरेकर यांची नियुक्ती करण्यात आली याबद्दल त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मोरणा विभागातील कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला .

मोरणा विभागातील नाटोशी गावचे वरेकर कुटुंब माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाते, भागवतराव आनंदराव वरेकर राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत, शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी पक्षाचे यांची पक्षाच्या मुंबई कमेटीच्या प्रमुख सल्लागारपदी त्यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली.

या निवडीबद्दल त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मोरणा भागाच्या वतीने युवा नेते सत्यजितसिंह पाटणकर यांचे प्रमुख उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात आला,

यावेळी संजय हिरवे, नथुराम मोरे ,नाना मोरे,चंद्रकांत शिर्के ,जयवंत शेठ सुर्वे. सुनील शेठ मोरे. रंगराव जाधव. मुंबई राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष अमर पवार.श्रीनिवास पाटील व सर्व मुंबई वाशी तरुण व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला, पुढील राजकीय सामाजिक शैक्षणिक सर्व तरुण मित्रपरिवार यांना संघटित करून व सर्वांना बरोबर घेऊन श्री शरदचंद्रपवार राष्ट्रवादी पक्षाची वाढ करण्यासाठी सर्वांच्या उपस्थितीत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## विजय परशुराम बेबले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

पाटण : मारूल तर्फ पाटण गावचे सुपुत्र, नवी मुंबई महानगरपालिकेत शाळा क्रमांक १११ तुर्भे स्टोअर नवी मुंबई या शाळेत सहाय्यक शिक्षक पदावर कार्यरत असलेले विजय परशुराम बेबले यांना संदीप नाईक प्रतिष्ठान नवी मुंबई यांच्यातर्फे शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

नवी मुंबई येथे येथे संदीप नाईक प्रतिष्ठान यांच्या वतीने पुरस्कार सोहळा संपन्न झाला, याड सोहळ्यास मा. खासदार . संदीप नाईक यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते. विजय बेबले हे गेले अनेक वर्षांपासून शिक्षक म्हणून सेवा करत आहेत, शैक्षणिक सह सामाजिक क्षेत्रात ते कार्यरत आहेत, या आगोदर त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे,

- नमुंमपा शाळा क्रमांक १११ तुर्भे स्टोअर नवी मुंबई, कोयनामाई सामाजिक संस्था कोयना विभाग मुंबई पाटण तालुका मित्र मंडळ मुंबई माजी विद्यार्थी संघ न्यु इंग्लिश स्कूल मारूल विश्वास ग्रामीण बिगर शेती पतसंस्था मारूल ग्रामस्थ मंडळ मारूल तर्फ पाटण आदी सामाजिक संस्था, संघटना, हितचिंतक यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफथेल्मोलॉजी' चे ३१ व्या वर्षात पदार्पण

**पुणे:**'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफथेल्मोलॉजी' या सुपर स्पेशालिटी नेत्र रुग्णालयाने ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे.'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफथेल्मोलॉजी' चे उद्घाटन १९९३ साली डॉ.पी.एन.नागपाल,तत्कालीन मंत्री पुष्पाताई हिरे,डॉ.बानू कोयाजी,अण्णा जोशी आणि भारत सावंत यांच्या उपस्थितीत झाले होते. त्यानंतर शिवाजीनगर येथील संस्थेच्या भव्य वास्तूमध्ये लाखो रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले आहेत.

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफथेल्मोलॉजी' हेनॅशनल एक्रिडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर' आणि जेसीआय मान्यताप्राप्त पुण्यातील



पहिले नेत्र रुग्णालय आहे.डॉ. श्रीकांत केळकर आणि सौ.अरुणा केळकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने अत्याधुनिक तंत्रज्ञान व प्रशिक्षित,अनुभवी कर्मचाऱ्यांची एक तज्ञ टीम एकत्र आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत.२० हून अधिक नेत्रतज्ञ आणि ७० हून अधिक नर्सिंग,पॅरामेडिकल आणि प्रशासनिक कर्मचारी कार्यरत आहेत.दशकानुदशके उच्च दर्जाचे मानदंड राखून 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफथेल्मोलॉजी' हे पुणे व परिसरातील रुग्णांसाठी नेत्रउपचारासाठी सर्वोत्तम पर्याय बनले आहे.

येथे विशेष क्लिनिक,पूर्णपणे एकत्रित निदान,इमेजिंग आणि लेसर प्रणाली,अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर,डेकेअर रेकव्हरी सूट्स आणि अत्याधुनिक प्रशिक्षण व शिक्षण सुविधा समाविष्ट आहेत.



## राज्यपालांच्या हस्ते शिल्पकृतीचे अनावरण

मुंबई : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या मुख्यालयासमोर वृषभ (बुल) व सामान्य लोक दर्शवणारया शिल्पकृतीचे अनावरण केले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निर्मितीपासून इतिहास सांगणाऱ्या कॉफी टेबल पुस्तकाचे देखील प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष कुमार चौहान, डीआरचोकसी फिनसर्वचे व्यवस्थापकीय संचालक देवेन चोकसी तसेच गुंतवणूकदार व एनएसईचे अधिकारी उपस्थित होते.

# हडपसरमधील बहुप्रतीक्षित विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहाचे लोकार्पण सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न

## लिलावती विठ्ठल तुपे यांच्या हस्ते नाट्यगृहाचे उद्घाटन

**हडपसर :** हडपसर- माळवाडी येथील बहुप्रतिक्षित पुणे महानगरपालिकेच्या विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहाचे लोकार्पण सोहळा स्व.खासदार विठ्ठल तुपे यांच्या पत्नी लिलावती तुपे यांच्या हस्ते हडपसर मधील भव्य अशा नाट्यगृहाचे फीत कापून लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

पुणे महापालिकेने बांधलेल्या नाट्यगृह उद्घाटनास हडपसरचे आमदार चेतन तुपे, लिलावती तुपे, पाटील,महापालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले , अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज. बी.पी.शहर अभियंता प्रशांत वाघमारे, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार जगन्नाथ शेवाळे ,अखिल भारतीय मराठी चित्रपट मंडळाचे अध्यक्ष मेघराज भोसले, सुरेश घुले, माजी महापौर वैशाली बनकर, माजी नगरसेवक फारुखभाई इनामदार, मारुती आबा तुपे,अशोक कांबळे, सुनील बनकर, प्रशांत म्हस्के, माजी नगरसेविका नंदा लोणकर, विजया वाडकर, सुरेखा कवडे, हसीना इनामदार,



वासंती काकडे, स्मिता गायकवाड, चंद्रकांत कवडे, मंगेश तुपे, शिवाजी पवार, जीवन जाधव, ड के.टी.आरु, प्रशांत बोगम, सिनेमा , नाट्यक्षेत्रातील कलाकार व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन २००९ पासून नाट्यगृहाच्या कामास सुरुवात झाली.गेली १५ वर्ष या नाट्यगृहाचे काम सुरू होते.दोन एकरात उभा राहिलेले नाट्यगृहाचा खर्च सुमारे ४५ कोटी रुपये झाला आहे. व्यासपीठ हे ९० बाय ४५ फुटाचे आहे. एकूण आसन क्षमता ८३८ आहे.त्यामध्ये व्यासपीठासमोर ६५९ व बाल्कनीमध्ये १७९ अशी बैठक व्यवस्था आहे.पार्किंग व्यवस्था १०७ मोटारी व ३५० दुचाकी अशी आहे.

व्यासपीठामागील बाजूस स्वच्छतागृह, दहा ग्रीन रूम्स, एक कॉन्फरन्स हॉल ,आर्ट गॅलरी व व्हीआयपी रूम्स यांसह हे सर्व नाट्यगृह वातानुकूलित आहे.अत्याधुनिक स्वयंचलित पडदे , चांगल्या दर्जाचे जेबीएल साऊंड सिस्टीम, चांगल्या खुर्च्या बसण्यास प्रशस्त अशी आसन व्यवस्था,संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असे नाट्यगृह वास्तु कुठेच पहायला मिळणार नाही असे अत्याधिक सोयीसुविधांनी नटलेलं नाट्यगृह रसिकांसाठी तमाम कलाकारांसाठी नाट्यगृह आजपासून खुले करण्यात आलेले आहे.

**नाट्यगृह उद्घाटनास पालक मंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्य मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील, दिलीप वळसेपाटील, व शहरातील आमदार यांची उद्घाटन कार्यक्रम पत्रिकेत महापालिका आयुक्तांकडून नावे टाकण्यात आली. मनपा आयुक्त यांनी दिलेल्या निमंत्रणास यातील कोणीच कार्यक्रमास उपस्थित राहिले नसल्याने उपस्थितीतां मध्ये चर्चा होती ऐवढा मोठ्या भव्य नाट्यगृहाचे लोकार्पण सोहळा पार पडत असताना उपस्थित राहायला पाहिजे होते असे अनेकांनी बोलून दाखवले. लोकार्पण सोहळ्यासाठी नाट्यगृह रसिकांनी खच्चा खच्च भरले होते.नेते मंडळी उपस्थित नसताना ही सोहळा दिमाखदार झाला.**

**माझे वडील हडपसर कॅन्टोन्मेंट भागाचे तीनवेळा आमदार व खासदार म्हणून कारकिर्द गाजवली , ते उत्तम कलाकार ही होते. सिने अभिनेते निळू फुले व अन्य कलाकारांमध्ये वावरले.ते कलाकार असताना राजकारणात वळले.हडपसर भागात एक नाट्यगृह व्हावे अशी त्यांची इच्छा होती.ती पूर्ण झाली.मी गेले अनेक वर्ष या नाट्यगृहाच्या कामासाठी वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे, अनेक वर्ष काम लांबलेले होते. आज मितीस ते पूर्ण झाल्याचे समाधान आहे. त्यामुळे सांस्कृतिक वारसा असलेल्या हडपसर परिसरातील स्थानिक कलाकार व रसिकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. श्रद्धेय विठ्ठल तुपे पाटील यांच्या नावाने हे नाट्यगृह आहे. आज त्यांच्या जयंतीच्या दिवशी या नाट्यगृहाचा लोकार्पण होत आहे हा आमच्यासाठी दुग्धशर्करा योग आहे. रसिकांना ते खुले होत असल्याचे मोठे समाधान आहे**

**चेतन तुपे पाटील**
**आमदार, हडपसर विधानसभा**

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# गणपती बाप्पाची कोणत्या रंगाची मूर्ती घरी आणावी?



येत्या काही दिवसातच गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. यंदा लाडक्या बाप्पाला घरी आणण्यासाठी काही खास गोष्टींची काळजी घ्या. गणपती बाप्पाची मूर्ती खरेदी करताना काही गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच योग्य दिशेला गणपती बाप्पाची स्थापना करावी. गणपती बाप्पाची मुर्ती कशी असावी ते जाणून घेऊया.

गणेशोत्सव दरवर्षी मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. यंदा ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवावला सुरूवात होईल. यावर्षी तुम्हीही गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करत असाल तर वास्तूचे नियम नक्की लक्षात ठेवा.गणेशोत्सवाच्या तयारीला सुरुवात झालेली आहे. दरवर्षी भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीपासून सलग १० दिवस गणेश उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. यावेळी घरातील घरच्या मंदिरात किंवा पूजा मंडपात गणपतीची मूर्ती बसवली जाते आणि विधीनुसार त्याची पूजा केली जाते. द्रिक पंचांगानुसार, यावर्षी ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सव सुरु होईल. या दिवशी गणेश चतुर्थी साजरी केली जाईल. तसेच १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थीच्या दिवशी गणपती विसर्जनासोबतच गणेशोत्सव संपेल. गणेश चतुर्थीनिमित्त देशभरात आनंदाचे वातावरण आहे. महाराष्ट्रात या उत्सवाचे विशेष वैभव दिसून येते. गणपती बाप्पाच्या आगमनाचा आनंद साजरा करण्यासाठी मंदिरे आणि मंडप सजले आहेत. वास्तूनुसार, गणेशोत्सवानिमित्त गणपती बाप्पाची मूर्ती खरेदी करताना काही खास गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

**गणेश मूर्ती घरी आणताना काय करावे**

श्रीगणेशाची मूर्ती आणण्यासाठी घराबाहेर पडताना डोक्यावर टोपी घालून घराबाहेर पडावे. गणेश मूर्ती कपड्याने झाकून घरी आणण्याची प्रथा आहे. गणपती घरी आणताना त्या जागेवर अक्षता, गुलाल वाहून गणपती घरी आणावा. कारण अक्षता या अखंड असतात आणि त्या भंग पावत नाहीत. श्रीगणेशाची स्थापना ईशान्य दिशेला करावी.

**गणेशजींच्या मूर्तीशी संबंधित वास्तू टिप्स....**

**–वास्तुशास्त्रानुसार, हिरवी गणेशमूर्ती उत्तर दिशेला बसवल्यास पैशासंबंधीच्या समस्या दूर होतात.**

**– काळ्या रंगाची गणेशमूर्ती उत्तर– पूर्व दिशेला ठेवली पाहिजे. वास्तूनुसार, असे केल्याने मानसिक तणाव आणि रोग दोषांपासून मुक्ती मिळते.**

**– केशरी रंगाचा गणपती बाप्पा दक्षिण किंवा आग्नेय दिशेला ठेवा. असे मानले जाते की, यामुळे आत्मविश्वास वाढतो.**

**– जीवनात सुख, शांती आणि आशीर्वाद मिळवण्यासाठी पांढऱ्या रंगाची गणेशमूर्ती घरी आणू शकता. या रंगाचा गणपती उत्तर–पश्चिम दिशेला ठेवावा.**

**– वास्तू तज्ज्ञांच्या मते, घरातील मंदिर, स्वयंपाकघर आणि कार्यालयात वास्तू दोष दूर करण्यासाठी श्रीगणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करणे शुभ असते.**

**– वास्तूशास्त्रानुसार, घरात गणपतीच्या जास्त मूर्ती ठेवू नयेत.**

**–घरामध्ये डाव्या सोंडेने गणपतीची मूर्ती बसवणे फायदेशीर मानले जाते.**

**– घरामध्ये गणपतीची मूर्ती ठेवण्यासाठी मूर्तीची उंची ६ इंचांपेक्षा जास्त नसावी.**



## विसर्जन मिरवणुकीबाबत ‘दगडूशेठ हलवाई’ ट्रस्टचा मोठा निर्णय

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या ‘श्री’च्या मुर्तीची प्रतिष्ठापना कर्नाटक हुमनाबाद येथील श्री दत्त सांप्रदायाचे श्री ज्ञानराज महाराज माणिकप्रभू यांच्या हस्ते होणार आहे. तर गेल्यावर्षीप्रमाणे यंदा विसर्जन मिरवणुकीत ट्रस्टचा रथ दुपारी चार वाजता सहभागी होणार आहे. यंदा गणेशोत्सवात हिमाचल प्रदेशमधील जटोली शिवमंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. गणेश चतुर्थीला प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी सकाळी ८.३० वा. मुख्य मंदिरापासून सिंह रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक निघेल. यंदा ट्रस्टकडून जटोली शिवमंदीराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे.

आशियातील सर्वात उंच शिवमंदिर म्हणून जटोली मंदिर ओळखले जाते. या मंदिराच्या प्रतिकृतीचा आकार १२५ फूट लांब, ५० फूट रंद आणि १०० फूट उंच असणार आहे. मंदिराची प्रतिकृती फायबर मध्ये उभारण्यात येत असून त्यावर रंगकाम करण्यात आले आहे. मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रीं चे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक अमन विधाते यांनी मंदिराचे काम, विद्युतरोषणाइचे काम वाईकर बंधू, मंडपव्यवस्था काळे मांडववाले यांनी केली आहे.

येत्या ७ सप्टेंबर रोजी आपल्या लाडक्या बाप्पाचे आगमन घरोघरी होणार आहे. सणासुदीच्या निमित्ताने बाजारपेठा देखील सजल्या आहेत. पुण्यातील गणशोत्सवाला मोठी परंपरा आहे. पुणे शहरातील गणपती बाप्पाची विसर्जन मिरवणूक हे भक्तांचे मोठे आकर्षण आहे. मात्र अनेकदा ही विसर्जन मिरवणूक लांबते. त्यामुळे यंदाच्या वर्षी मिरवणूक वेळेत होण्यासाठी शश्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने एक मोठा निर्णय घेतला आहे. यंदादेखील मागील वर्षीप्रमाणे दुपारी ४ वाजता मिरवणुकीत ट्रस्टने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. अनंत चतुर्दशीला (दि. १७) दुपारी चार वाजता श्रींची वैभवशाली सांगता मिरवणूक श्री उमांगमलज रथातून निघणार आहे. रथापुढे दोन बॅण्ड पथक आणि एक ढोल ताशा पथक असेल. पोलिस प्रशासनाने विसर्जन मार्गावर उभे असलेल्या ढोल ताशा पथकांना मिरवणुकीत सहभागी होण्यापासून रोखले पाहिजे असे रासने यांनी नमूद केले. गणेश चतुर्थीला (दि.७) सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना होईल. याच डिव्हसी सायं. ७ वा. मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उदघाटन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते होईल, अशी माहिती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी व सरचिटणीस हेमंत रासने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## बाप्पाच्या मेजवानीत करा केसर भाताचा समावेश

गणपती बाप्पाचे आगमन अवघ्या काही दिवसांवर आले आहे. त्याच्या स्वागताची तयारी आता सर्वत्र सुरु झाली आहे. आज आम्ही तुमच्यासाठी एक खास रेसिपी घेऊन आलो आहोत. या रेसिपीचा समावेश तुम्ही बाप्पाच्या मेजवानीत करू शकता. या रेसिपीचे नाव आहे गोड केसर भात, तुम्ही प्रसादासाठीही हा भात तयार करू शकता.

गणेश चतुर्थी आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. नेहमीप्रमाणे बाप्पाच्या स्वागतासाठी सर्वजण आतुर झाले असून आता स्वागताच्या तयारींना सुरुवात झाली आहे. बाप्पाचे आगमन झाले की सर्वप्रथम पूजा-अर्चा आणि नैवेद्याच्या तयारींना सुरुवात होते. याच पार्शवभूमीवर आज आम्ही तुमच्यासाठी एक खास रेसिपी घेऊन आलो आहोत.बाप्पाच्या मेजवानीत अनेक पदार्थांचा समावेश होतो. यात तुम्ही केसर भाताचा समावेश करू शकता. हा गोड केसर भात बाप्पाच्या मेजवानीची रंगात वाढवेल. तसेच याची चव इतकी छान असते की आम्हाला खात्री आहे तुम्ही एकद हा बनवला तर पुन्हा बनवल्याशिवाय राहणार नाही. हा भात चवीला फार अप्रतिम लागतो तसेच कमी साहित्यापासून तयार केला जातो. लहानांपासून





मोठ्यांपर्यंत हा पदार्थ सर्वांनाच फार आवडेल. जाणून घ्या यासाठी लागणारे

**साहित्य** : १ कप बासमती तांदूळ, ३/४ कप साखर, २ टेबलस्पून देशी तूप, ५-६ कप पाणी, १ तमालपत्र, २ लवंग,१ टेबलस्पून बदाम कापलेले, १ टेबलस्पून काजू कापलेले, ४ हिरव्या वेलचीची पूड, १५ केशर धागे, १ चिमूटभर पिवळा खाण्याचा रंग. **कृती:** केसर भात बनवण्यासाठी सर्वप्रथम तांदूळ स्वछ पाण्याने धुवून अर्धा तास पाण्यात भिजत ठेवाआता एका भांड्यात दूध, केशर आणि पिवळा रंग घालून काहीवेळ तसेच राहुद्यातयानंतर वेलचीची साल काढून एका भांड्यात ठेवावी आणि काजू आणि बदामाचे ही लहान तुकडे करावेतआता गॅसवर एक कढई ठेवा आणि यात तूप टाकामग यात तमालपत्र, लवंग आणि वेलची टाका आणि परतून घ्या यानंतर यात तांदूळ आणि उर्वरित सामग्री टाका आणि मिक्स करानंतर यावर झाकण ठेवून दोन मिनिटे ,मंद आचेवर वाफवून घ्यायानंतर यात पाणी टाका आणि तांदूळ शिजण्यासाठी ठेवून द्या तांदूळ चांगला शिजला की तांदळाचे पाणी चाळणीतून गाळून थंड होण्यासाठी भांड्यात ठेवा आता गॅसवर एक दुसरी कढई ठेवा आणि यात तूप टाका तूप गरम झाले की यात काजू टाकून मंद आचेवर गुलाबी होईपर्यंत परतून घ्या आता त्याच कढईत शिजवलेल्या तांदळासोबत साखर घाला मग या तांदळावर तयार केलेला केशराचा रंग टाका आणि मिक्स करा गॅसची फ्लेम वाढवा आणि तांदूळ मिक्स करून पाक कोरडे होऊ द्यायानंतर भातावर वरून वेलची, काजू, बदाम घाला आणि काहीवेळ थंड होऊ द्या अशाप्रकारे तुमचा केसर भात तयार होईल बाप्पाला प्रसादासाठी तुम्ही हा भात तयार करू शकता

## बाप्पाने पहिल्यांदा मोदक कधी आणि कुणाकडे खाल्ला?

गणेश चतुर्थी हा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सर्वत्र बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरु झाली आहे. बाप्पाच्या आगमनावेळी आपल्याकडे उकडीचे मोदक बनवण्याची प्रथा आहे. मात्र देवाला अतिप्रिय असणारा हा पदार्थ नक्की कुठून आला आणि बाप्पाने हा पदार्थ प्रथम कधी खाल्ला तुम्हाला माहिती आहे का? नाही तर मग आजच याची रंजक कथा

गणेश चतुर्थी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सर्वत्र गणेशाच्या आगमनाची सुरुवात झाली आहे. गणेश चतुर्थी हा महाराष्ट्रातील एक प्रमुख सण आहे, हा सण फक्त महाराष्ट्रातच नाही देशभरात मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा केला जातो. आता ठिकठिकाणी गणपतीचे मोठमोठे पंडाल लावण्यात आले आहेत. मेजवानीची तयारी सुरु झाली आहे. आता गणपतीसाठीची मेजवानी आणि त्यात मोदक नाही असे तर होऊच शकत नाही.

मोदक हा पदार्थ बाप्पाच्या सर्वात जवळचा आणि आवडीचा पदार्थ मानला जातो. नेहमी गणपतीच्या नैवेद्यासाठी हा पदार्थ आवर्जून बनवला जातो. आपण अनेकदा हे मोदक देवासाठी बनवले असतील यांचा आस्वाद घेतला असेल मात्र हे मोदक कसे बनवले गेले आणि बाप्पाने हे मोदक प्रथम कधी खाल्ले तुम्हाला माहिती आहे का? नाही तर मग आजच या मोदकांची रंजक कथा जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या लेखातून मोदक आणि गणपतीचा काय संबंध आहे ते सविस्तर सांगणार आहोत.

### इ.स.पूर्व २०० पासून मोदक बनवले जात आहेत?

पाकशास्त्रीय इतिहासकारांच्या मते, मोदक हा एक प्राचीन गोड पदार्थ आहे जो सुमारे २०० ईसापूर्व पासून अस्तित्वात आहे. असे म्हटले जाते की आयुर्वेद, रामायण, महाभारतात देखील याचा उल्लेख आहे जेथे गोड भरणासह गोड स्टफिंग म्हणून वर्णन केले आहे. त्याच वेळी, काही लोकांचा असा विश्वास आहे की या स्वीट डंपलिंगचा शोध चिनी वैद्यकीय व्यवसायी झांग झोंगजिंग यांनी लावला होता. तो पूर्वेकडील हान राजवंशातील होता.

मोदक भारतात अनेक प्रकारे बनवले जातात आणि वेगवेगळ्या नावांनीही ओळखले जातात. त्याची सर्वात लोकप्रिय व्हर्जन उकडीचे मोदक असे आहे, जे तुपासह गरमा गरम खाल्ले जातात. मोदकांचा उगम सर्वप्रथम महाराष्ट्रात झाला असे मानले जाते, परंतु ते कसे तयार झाले आणि कोणी तयार केले हे पूर्णपणे माहित नाही.भारतात मोदकाला अनेक नावे आहेत, जसे तमिळमध्ये याला मोथागम किंवा कोझुकट्टाई म्हणतात. तेलुगूमध्ये याला कुडूम म्हणतात आणि कन्नडमध्ये मोधाका किंवा कडुबू म्हणून ओळखले जाते. हे विशेषतः गणेश चतुर्थीच्या वेळी बनवले जातात. मोदक हे तांदळाचे पीठ, गूळ, ताजे किसलेले खोबरे, ड्राय फ्रुट्स आणि तुपापासून तयार केले जाते. हा एक गोडाचा पदार्थ आहे.





**मोदक आणि गणपतीचा काय संबंध आहे?**

हिंदू पौराणिक कथेनुसार हा गोड पदार्थ गणपतीला अतिप्रिय आहे. पौराणिक कथेनुसार, एके दिवशी ऋषी अत्रि यांची पत्नी अनुसूया देवीने भगवान शंकरांना आपल्या कुटुंबासह आपल्या घरी जेवायला आमंत्रित केले होते. या निमंत्रणात भगवान शिव आपल्या कुटुंबासह दाखल झाले. देवी अनुसयाने सर्वांना विनंती केली की, गणपती बाप्पा जेवण संपवतील तेव्हाच मेजवानीला बसावे. पण छोटा गणपती पुन्हा पुन्हा जेवण मागत राहिला मात्र त्यांचे पोट काही केल्या भरत नव्हते.हे पाहूनमाता पार्वतीने जेवल्यानंतर गणेशाला एक मोदक खाण्यासाठी दिला ज्याला खाताच गणोबाचे पोट भरले आणि त्यांनी एक ढेकरदेखील दिली. यानंतर माता पार्वतीने देवी अनुसूयाला विनंती केली की आता ती आपल्या उर्वरित पाहुण्यांना मेजवानीसाठी बसवू शकते, कारण भगवान गणेश संतुष्ट झाले आहेत. हे पाहून अनुसूया देवी आश्चर्यचकित झाली आणि तिने पार्वतींकडून त्याची रेसिपी मागितली. यानंतर पार्वतीजींनी विनंती केली की, आपल्या पुत्राच्या सर्व भक्तांनी तिला एकवीस मोदक अर्पण करावेत, असे केल्यास देव प्रसन्न होतील आणि त्यांची इच्छा पूर्ण होईल.

## बाप्पाचे स्वागत करा गोड पदार्थांनी

### बनवा बेसन बर्फी

**यंदाच्या गणपती उत्सवात बाप्पाच्या नैवेद्यासाठी तुम्हाला गोडाचे पदार्थ घरी बनवायचे असतील तर तुम्ही बेसनपासून बर्फी बनवू शकता. बेसन बर्फी कमीत कमी साहित्यामध्ये झटपट तयार होते. सण उत्सवाच्या दिवसांमध्ये बाजारात मोठ्या प्रमाणावर भेसळ युक्त मिठाई विकली जाते. भेसळयुक्त मिठाईचे सेवन केल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये बेसन बर्फी बनवू शकता.**

गणपती बाप्पाच्या आगमनासाठी अवघी मुंबईपुरी सज्ज झाली आहे. बाप्पाच्या आगमन सोहळ्याला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे यंदाच्या गणपती उत्सवात बाप्पाच्या नैवेद्यासाठी तुम्हाला गोडाचे पदार्थ घरी बनवायचे असतील तर तुम्ही बेसनपासून बर्फी बनवू शकता. बेसन बर्फी कमीत कमी साहित्यामध्ये झटपट तयार होते. सण उत्सवाच्या दिवसांमध्ये बाजारात





मोठ्या प्रमाणावर भेसळ युक्त मिठाई विकली जाते. भेसळयुक्त मिठाईचे सेवन केल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे जास्तीचे पैसे खर्च न करता तुम्ही कमीत कमी साहित्यामध्ये बेसन बर्फी बनवू शकता. बेसन बर्फी चवीला गोड आणि सुंदर लागते. चला तर जाणून घेऊया बेसन बर्फी बनवण्याची सोपी रेसिपी.

**साहित्य:** बेसन पीठ, साखर, तूप, वेलची पावडर, काजू बदाम तुकडे.

**कृती:** बेसन बर्फी बनवण्यासाठी सर्वप्रथम कढईमध्ये तूप टाकून गरम करून घ्या. तूप गरम झाल्यानंतर गॅस बारीक करून त्यात बेसन पीठ टाका.बेसन पीठ मंद आचेवर लाल होईपर्यंत व्यवस्थित भाजून घ्या. पीठ भाजताना ते सतत चमच्याने ढवळत राहा, अन्यथा पीठ कढईला चिटकू शकते.साखरेचा पाक बनवण्यासाठी टोपात पाणी घालून पाण्याला उकळी आल्यनंतर त्यात साखर टाकून वितळवून घ्या.पाक तयार झाल्यानंतर त्यात वेलची पावडर टाकून मिक्स करा. तयार पाक बेसनाच्या पिठात ओतून मिक्स करा.पीठ व्यवस्थित मिक्स करून झाल्यानंतर गॅस बंद करा. बर्फी बनवण्यासाठी ताट किंवा डबा घेऊन त्याला तूप लावा.नंतर त्यात काजू, बदामाचे तुकडे आणि केशराच्या काड्या टाकून त्यावर तयार बेसनाचे पीठ टाकून सेट होण्यासाठी ठेवा.बर्फी सेट झाल्यानंतर सुरीच्या सहाय्याने कापून सर्व्ह करा.

## झटपट बनवा पनीरपासून कलाकंद

**लवकरच हाणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. गणपती सणाची सगळेच आतुरतेने वाट पाहत असतात. गणपती बाप्पा घरी आल्यानंतर सगळीकडे आनंद आणि उत्साहाचे वातावरण असते. त्यामुळे यंदाच्या गणशोत्सवात बाप्पाच्या नैवेद्यासाठी खास पदार्थ नक्की बनवा. आज आम्ही तुम्हाला पनीरपासून कलाकंद बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत.**

देशभरात सगळीकडे गणपती बाप्पाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरु आहे. मुंबई, पुण्यासह कोकणात मोठ्या उत्साहात आणि आनंदात गणपती बाप्पाचे आगमन केले जाते. सर्वच लोक बाप्पाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहेत. बाप्पा घरात विराजमान झाल्यानंतर त्यांची मनोभावे पूजा करून गोडाचा नैवेद्य दाखवला जातो. यंदाच्या वर्षी ७ सप्टेंबरला गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. गणपतीची मनोभावे सेवा करण्यासाठी सगळेच भक्त आतुर झाले आहेत. त्यामुळे यंदा बाप्पाच्या नैवेद्याला काही खास पदार्थ नक्की बनवा. आज आम्ही तुम्हाला गणपती बाप्पाच्या नैवेद्यासाठी पनीरपासून कलाकंद कसा बनवायचा याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. कलाकंद बनवण्यासाठी सुद्धा सोपा असल्यामुळे कमीत कमी साहित्यामध्ये तयार होतो. चला तर जाणून घेऊया



**साहित्य** : पनीर, खावा,साखर, बदाम, पिस्ताचे बारीक तुकडे, वेलची पावडर, ड्राय फ्रुट, सुकलेल्या गुलाबाच्या पाकळ्या. **कृती:** कलाकंद बनवण्यासाठी सर्वप्रथम पनीरचे बारीक तुकडे करून घ्या. त्यानंतर मिक्सरमधून पनीर बारीक करा.कढईमध्ये तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यानंतर त्यात पनीरचे बारीक केलेले मिश्रण टाकून व्यवस्थित परतून घ्या.नंतर त्यात चवीनुसार साखर टाकून साखर वितळेपर्यंत चमच्याने सतत मिक्स करत राहा. अन्यथा मिश्रण कढईला लागू शकते.त्यानंतर त्यात वेलची पावडर, खावा टाकून मिक्स करून गॅस बंद करा.ताटाला किंवा छोट्या डब्याला तूप लावून त्यात चिरलेले बदाम, पिस्ता आणि गुलाबाच्या पाकळ्या टाकून सगळीकडे पसरवा.तयार केलेला कलाकंद ताटात पसरवून थंड झाल्यानंतर त्याचे तुकडे करून घ्या. सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला कलाकंद तयार आहे.बाप्पाच्या नैवेद्यासाठी बनवलेला कलाकंद तयार आहे.